# ऋणनिर्देश

''मृणालिनी देसाई यांच्या 'पुत्र मानवाचा' या कादंबरीचा विवेचक अभ्यास"हा विषय एम्. फिल्. च्या लघु-शोध - प्रबंधासाठी निवडण्यामागे मार्गदर्शिका प्रा. डॉ. सौ. शुभांगी शशिकांत भुतकर यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून मार्गदर्शन मिळाले व हा विषय निश्चित केला.

सर्व विश्वामध्ये शांतता असावी असे वाटते. पण ते शक्य होत नाही. कारण, अहिंसेचा मार्ग खडतर होत चालला आहे. जुन्या विचारांना जवळ करावेसे वाटते आणि हे काम साहित्य करणार यात शंका नाही. गांधीवादी विचार आज साहित्यात येऊ लागले आहेत कारण, गांधीविचार हिमालयासारखे उत्तुंग वाटतात. त्यांच्या विचारात संस्कार करण्याचे सामर्थ्य आहे. शालेय जीवनापासूनच मला गांधीजींविषयी, त्यांच्या विचारांविषयी कुतूहल वाटायचे याचेच फलित म्हणजे एके दिवशी 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी माझ्या वाचण्यात आली. 'मृणालिनी देसाई' यांनी गांधीजींचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे विचार इतके वेधक मांडलेले दिसतात की, त्यामुळे गांधीजी विषयीचे माझे कुतूहल पूर्ण झाले असेच म्हणावेसे वाटते.

'लघु-शोध - प्रबंधाचे लेखन करताना मला अनेकांचे मोलाचे सहकार्य लाभले, असे प्रेमळ व निरपेक्ष सहकार्य लाभणे ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत मला एम्. फिल् साठी छत्रपती शिवाजी कॉलेजच्या माझ्या गुरु डॉ. सौ. शुभांगी शशिकांत भुतकर यांनी मला बहुमोल मार्गदर्शन केले. त्याबद्दल मला सदैव त्यांच्या ऋणातच राहावे लागेल.

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करताना शिवाजी विद्यापीठातील डॉ. कृष्णा किरवले, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. तसेच



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

छ. शिवाजी कॉलेजचे प्राचार्य जे. जी. जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले आणि प्राचार्य शशिकांत नारायण भुतकर यांचे मार्गदर्शन शोध - निबंध पूर्ण करण्यास मोलाचे ठरले, म्हणून मी या सर्वांचा सदैव ऋणी आहे.

लघु-शोध-प्रबंधाचा अभ्यास पूर्ण करताना सातारा येथील छ. शिवाजी कॉलेजचे ग्रंथालय, तेथील सेवक वर्ग व कार्यालयीन सेवक वर्ग यांची सतत मदत मिळाली त्याबद्दल मी त्यांचे विशेष आभार मानतो.

छत्रपती शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागातील प्राध्यापकांचे मला वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. पुणे येथील 'मराठी साहित्य परिषद' ग्रंथालय यातील कर्मचारी वर्ग यांनी मला संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिले यामुळे मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

मी शिक्षण घेत असताना मला सतत प्रोत्साहन देणारी माझी आई श्रीमती अनुसया बोराटे, पत्नी सौ. स्वाती बोराटे, मोठा भाऊ राम बोराटे आणि वहिनी सौ. मनिषा बोराटे यांचा आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी असल्यामुळे मी उच्च शिक्षणापर्यंतचा प्रवास करू शकलो. मित्रवर्ग आणि श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटणचे नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. कुलकर्णी सर, माझे प्राध्यापक सहकारी या सर्वांचे ऋण न फिटण्यासारखे आहेत, कारण यांच्या सहकार्याशिवाय संशोधन करणे शक्य झाले नसते.

या प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने टंकलेखन करून देणाऱ्या सौ. स्वाती जामदार यांचाही मी आभारी आहे.